RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क. अंमलबजावणी व कार्यवाहीचे फलीत अभ्यासणे

**प्रा. डॉ. कांबळे गोविंदराव शंकरराव**
सहाय्यक प्राध्यापक
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन,
सातारा.

**प्रास्ताविक**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 हा संपूर्ण देशभर जम्मू आणि काश्मीर वगळून 1 एप्रिल 2010 पासून लागू झाला. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने शिक्षणाचा हक्क नियम 2011 नियमावली तयार केली जेणे करुन संबंधित अधिनियमाची अंमलबजावणी करणे सोपे जावे.

भारतात प्राचीन काळापासून शिक्षण सर्व घटकांना मिळावे यासाठी प्रयत्न केले गेले आहेत. परंतू आजतागायत शासनाला त्यात 100% यश प्राप्त झालेले नाही. त्याची अनेक कारणे आहेत. महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.भिमराव आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केलेले आहेत. घटनेत तशी तरतूद देखील केली परंतू घटनेनुसार भारतात म्हणावे तेवढे यश शिक्षण हक्क लाभले नाही. त्यामुळे 2009 साली पुन्हा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क कायदा शासनाला करावा लागला.

बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या अधिनियमाची पार्श्वभूमी आपण माहीत करुन घेतली आहे. भारतातील 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांच्या दृष्टीने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 पारित होणे हा क्रांतिकारी क्षण आहे. या कायद्यामुळे उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा बालकांना अधिकार प्राप्त झाला आहे. बालाकांना बालस्नेही (Child friendly) वातावरणामध्ये सहज व सोप्या पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी अधिनियम व नियमावलीमध्ये विविध तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. अशा तरतुदींचे आकलन आपण करुन घेऊन त्याची योग्य अंमलबजावणी केली तरच बालकांना शिक्षणाचा हक्क प्राप्त होईल. अशा काही महत्त्वाच्या तरतुदींचा परिचय करुन घेऊ.

**1) चाळणी प्रक्रियेशिवाय प्रवेश :– (कलम 13)**

अधिनियम लागू होण्यापूर्वी बऱ्याच शाळांमध्ये मुलाखती, लेखी परीक्षा इत्यादी प्रकारे चाळणी प्रक्रिया घेऊन बालकांना प्रवेश दिला जात होता. शाळा प्रवेश होण्यासाठीच मुलांना अशा परीक्षांना सामोरे जावे लागले तर, बालक पुढे शाळेत कसे काय रमणार? त्याला शाळा आपली कशी वाटणार? या अधिनियमामुळे आता बालाकांना कोणत्याही चाळणी प्रक्रियेशिवाय शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. यापुढे कोणत्याही शाळेत प्रवेशासाठी मुलाखती, लेखी परीक्षा अथवा अन्य चाळणी परीक्षा घेता येणार नाही. प्राथमिक शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रवेशपात्र असणाऱ्या बालकांना प्रवेश घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

**2) निःशुल्क प्रवेश व शिक्षण :– (कलम 3)**

6 ते 14 वयोगटातील बालकाला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा मूलभूत हक्क प्राप्त झाला आहे. बालकाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची फी घेता येणार नाही. बालकाला आपले प्राथमिक शिक्षण तो राहत असलेल्या परिसरात पूर्ण करण्याचा हक्क आहे. प्राथमिक शिक्षण पूर्णपणे मोफत मिळण्याचा बालकाला हक्क आहे.

**3) वयानुसार प्रवेश व शिक्षण :– { कलम 4, नियम 3 (2) }**

बालकाचे वय सहा वर्षांपेक्षा अधिक असेल मात्र त्याने अद्याप कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला नसेल तर, त्याला वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. उदा.–आठ वर्षे पूर्ण वय असलेल्या बालकाला थेट इ. तिसरीत प्रवेश मिळेल. वयानुसार प्रवेश घेतलेल्या बालकाला विशेष शिक्षण मिळण्याचा हक्क आहे. अशा बालकांना वर्गात भावनिक दृष्ट्या समायोजन करण्यासाठी पूरक असे वातावरण मिळण्याचा हक्क आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**4) वर्षभरात केव्हाही प्रवेश :– {कलम 15, नियम 10 (1 व 2) }**

प्रवेशाचा वाढीव कालावधी शाळेचे नवीन सत्र सुरू होण्याच्या दिनांकापासून पहिले सत्र संपण्यापूर्वीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निश्चित करण्यात आला आहे. बालकाला शाळेमध्ये वाढीव कालावधीपर्यंत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. वाढीव कालावधीनंतरही बालकाला शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे. अशा उशिरा प्रवेश घेतलेल्या बालकाला विशेष शिक्षण मिळण्याचा हक्क आहे.

**5) वयाचा पुरावा नसल्यासही प्रवेश :– (कलम 14)**

बालकाला शाळेत प्रवेश घेताना, त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा वयाचा पुरावा नसेल तरीही त्याला शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे.

**6) दाखला हस्तांतरण :– (कलम 5)**

बालक शिक असलेल्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची सोय नसल्यास त्याला नजीकच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा हक्क आहे. बालकाला एका शाळेतून दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळण्यासाठी विनाविलंब दाखला मिळण्याचा हक्क आहे.

**7) शिक्षणातील सातत्य :– (कलम 16)**

कोणत्याही बालकाला कोणत्याही वर्गात मागे ठेवता येणार नाही. कोणत्याही बालकाला प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

**8) शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र :– (कलम 30)**

बलकाने प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर 'प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र' मिळण्याचा त्याला हक्क आहे.

**9) हक्कांचे संरक्षण :– {कलम 31 व 32 नियम 24 (1) }**

बलकांना प्रदान करण्यात आलेल्या हक्कांना संरक्षण मिळण्याचा त्याला हक्क आहे. याकरिता बालक राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांनी बालकांसाठी सुरू केलेल्या हेल्पलाईनच्या मदतीने एस.एम.एस. दूरध्वनी अथवा पत्राद्वारे किंवा अन्य कोणत्याही सुविधेद्वारे तक्रार नोंदवू शकतो किंवा त्याच्यावतीने पालक किंवा इतर कोणतीही व्यक्ती तक्रार नोंदवू शकते.

**10) बालस्नेही शिक्षण :– (कलम 17, 29)**

बालस्नेही व आनंददायी शालेय वातावरणात बालकेंद्रित पद्धतीने प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा बालकाला हक्क आहे तो खालीलप्रमाणे.

1) मनोरंजक व कृतियुक्त अध्ययन प्रक्रिया, 2) प्रसन्न व उत्साहवर्धक वर्ग शालेय परिसर, 3) शिक्षा न करता स्वयंशिस्तीची रुजवणूक, 4) गरजानुरूप भौतिक सुविधांची उपलब्धता, 5) विचारांच्या मुक्त अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, 6) विविध शैक्षणिक व खेळाचे साहित्य यांची उपलब्धता, 7) छंदाची जोपासना व निर्मितीचा आनंद, 8) शिक्षक विद्यार्थी आपुलकीचे नाते.

**11) मंडळाच्या परीक्षांची सक्ती नाही :– (कलम 30)**

प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत बालकाला कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक नाही.

वरील हक्क कायद्याने बालकाला बहाल करण्यात आले आहेत. बालकांना त्याचे हे हक्क मिळण्यासाठी पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक प्राधिकरण, शासन यांच्या जबाबदाऱ्या कायद्याने निश्चित केल्या आहेत.

**सारांश**

खाजगी शिक्षण संस्था आजही मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यास नाखुष आहेत. प्रवेश घेताना अनधिकृतरित्या डोनेशन व भरमसाठ फी घेत असल्याचे निदर्शनास येत आहे. राजकीय इच्छा शक्ती या अधिनियमाला पुरेशी नसल्याने कायदेशीर कार्यवाही संबंधित शिक्षण संस्थावर होत नाही. त्यामुळे या शिक्षण हक्क अधिनियमाचे फलीत आज तरी जैसे थे असेच असल्याचे जाणवत आहे.

**संदर्भ**

1) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे–मार्गदर्शिका.
2) www.governmentmaharashtra.com